



दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25




अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १३९ । किंमत - २ रू. संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) बुधवार । १०/०६/२०२६ । पाने - ६




# न्यायालय परिसरात आरोपीच्या समर्थनार्थ घोषणाबाजी

## २५ जणांविरोधात गुन्हा दाखल

एआय फोटो




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -संगमनेर येथील न्यायालय परिसरात अटक आरोपीच्या समर्थनार्थ घोषणाबाजी करत गोंधळ घालणाऱ्या २० ते २५ जणांविरोधात संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. न्यायदान प्रक्रिया सुरू असताना न्यायालयाच्या आवारात व्हिडिओ चित्रीकरण करून बेकायदेशीर जमाव जमवल्याचा आरोप संबंधितांवर ठेवण्यात आला आहे.

याबाबत संगमनेर शहर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस कर्मचारी चंद्रकांत विठ्ठल सदाकाळ यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली आहे.

त्यांच्या फिर्यादीनुसार, दिनांक ८ जून २०२६ रोजी त्यांच्यासह पोलीस कॉन्स्टेबल विकास साबळे, चालक पोलीस कॉन्स्टेबल ऋतिक बेनके आणि महिला पोलीस हवालदार सुजाता थोरात यांची अटक आरोपीला न्यायालयात हजर करण्याची ड्युटी होती.

सदर पथकाने संगमनेर शहर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा क्रमांक ३१४/२०२६ मधील अटक आरोपी सागर अशोक पगारे यास उपकारागृहातून ताब्यात घेऊन घुलेवाडी येथील न्यायालयात हजर केले. आरोपीला न्यायालयात नेण्यापूर्वी आणि न्यायालयीन प्रक्रिया सुरू असताना न्यायालयाच्या आवारात काही व्यक्तींनी आरोपीचे व्हिडिओ चित्रीकरण केल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

फिर्यादीनुसार, आरोपीचे मित्र असलेल्या यश सुनील धात्रक, रितेश शाम बिडवे, आनंद गांधी यांच्यासह अन्य २० ते २५ जणांनी न्यायालय परिसरात बेकायदेशीररित्या जमाव जमवून गोंधळ घातला. न्यायालयीन कामकाज सुरू असताना संबंधितांनी आरोपीचे व्हिडिओ शूटिंग केले तसेच आरोपीला न्यायालयातून बाहेर आणत असताना आयेगा तो अपना राज, सागर पगारे संगमनेर का बॉस अशा घोषणा देत त्याच्या कृत्याचे समर्थन केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

या प्रकारामुळे न्यायालय परिसरातील शिस्त आणि कायदा-सुव्यवस्थेला बाधा निर्माण झाल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. न्यायालया सारख्या संवेदनशील ठिकाणी जमावबंदीचे उल्लंघन करून घोषणाबाजी केल्याप्रकरणी संबंधितांविरोधात भारतीय न्याय संहिता (इछड) २०२३ मधील कलम १८९, १९०, १९१ आणि १९२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेमुळे न्यायालय परिसरातील सुरक्षा व्यवस्थेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून, न्यायालयीन प्रक्रियेदरम्यान आरोपींच्या समर्थनार्थ होणाऱ्या अशा प्रकारांवर पोलिसांनी कठोर कारवाईचा इशारा दिला आहे. पुढील तपास संगमनेर शहर पोलीस करत आहेत.

# संगमनेरमध्ये भेसळखोरीवर कारवाई कधी ?

## अमर कतारी यांचा संतप्त सवाल



युवावार्ता (प्रतिनिधी)

अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी राज्यभर भेसळयुक्त अन्नपदार्थांविरोधात धडक कारवाई सुरू केल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. मात्र, संपूर्ण महाराष्ट्रात कारवाई सुरू असताना संगमनेर तालुक्यात अद्यापही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख अमर कतारी यांनी केला आहे.


कतारी यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, संगमनेरमधील अनेक हॉटेल्समध्ये भेसळयुक्त पनीरचा वापर होत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. तसेच चायनीज खाद्यपदार्थ व अन्य जेवणामध्ये आरोग्यास घातक ठरणाऱ्या पदार्थांचा वापर होत असल्याचेही नागरिकांकडून सांगितले जात आहे. अन्नधान्य, कडधान्य, खाद्यतेल तसेच दुग्धजन्य पदार्थांमध्येही भेसळ करून ग्राहकांची फसवणूक होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

याशिवाय आईस्क्रीम, बेकरी आणि मिठाई व्यवसायात निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा वापर होत असल्याचे सांगत, दूध, पनीर आणि खवा यामध्ये मोठ्या प्रमाणावर भेसळ होत असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला आहे. बाहेरील राज्यांतील काही व्यावसायिक संगमनेरमध्ये मोठे व्यवसाय उभारून लाखो रुपयांची उलाढाल करत असताना त्यांच्या उत्पादनांच्या गुणवत्तेची तपासणी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

अन्न व औषध प्रशासन विभागाचे संगमनेर तालुका व अहिल्यानगर जिल्हास्तरीय अधिकारी याबाबत गप्प का आहेत, असा सवाल उपस्थित करत भेसळ करणाऱ्या सर्व हॉटेल्स, मिठाई दुकाने, खाद्यपदार्थ विक्रेते आणि संबंधित व्यावसायिक आस्थापनांची तातडीने तपासणी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी अमर कतारी यांनी केली आहे. नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांना कोणतीही माफी देऊ नये. तुकाराम मुंढे यांनी या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. अन्यथा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

दरम्यान, संगमनेरमध्ये अन्न व औषध प्रशासनाने अद्याप भेसळयुक्त अन्नपदार्थ विक्री करणाऱ्या (पान ४)

# मारहाणीतील मृत्यू प्रकरणी वाढीव कलम



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या मारहाणीच्या गुन्ह्यातील जखमी साक्षीदार भाऊ सलीम हरून शेख (वय ३५, रा. सुकेवाडी, संगमनेर) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. या घटनेने शहरात खळबळ उडाली असून पोलिसांनी या प्रकरणात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०५ अंतर्गत वाढीव कलमाचा समावेश केला आहे.

३१ मे रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास गाडी अडवून झालेल्या मारहाणीनंतर सलीम शेख यांना एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान ५ जून रोजी रात्री त्यांचा मृत्यू झाला. प्रारंभी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी हा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाल्याचे नमूद केले होते. मात्र, फिर्यादीचा भाऊ सलमान हरून शेख यांनी पोलिसांना दिलेल्या पुरवणी जबाबात गंभीर आरोप केले आहेत.

सलमान शेख यांच्या म्हणण्यानुसार, सलीम यांना लहानपणापासून हृदयाचा त्रास असल्याची माहिती आरोपींना होती. असे असतानाही आरोपींनी त्यांना शिवीगाळ करत मारहाण केली. विशेषतः संशयित आरोपी अकबर मोहम्मद शेख याने स्टील रॉडने पाठीवर मारहाण केल्यामुळे सलीम यांचा हृदयाचा त्रास वाढला आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला, असा आरोप फिर्यादीने केला आहे. या मारहाणी प्रकरणी तब्बल ८ जणांवर विविध कलमांतर्गत शहर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या पुरवणी जबाब आणि तपासातील निष्कर्षांच्या आधारे पोलिसांनी मूळ गुन्ह्यात कलम १०५ ची भर घातली आहे. त्याबाबतचा अहवाल न्यायालयात सादर करण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक फरहनाज पटेल करत आहे.

# उघडे रोहित्रे अन् वाकलेले खांब ठरू शकतात मृत्यूचे सापळे

## तातडीने दुरुस्तीची नगरसेवक जाजूंची महावितरणकडे मागणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पावसाळा तोंडावर आलेला असताना संगमनेर शहर आणि परिसरातील महावितरणचा कारभार अत्यंत रामभरोसे असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शहरात अनेक ठिकाणी महावितरण कंपनीचे रोहित्रे (डीपी) उघड्यावर असून, वीजवाहक तारा अत्यंत खाली आलेल्या आहेत. या धोकादायक परिस्थितीमुळे पावसाळ्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही गंभीर बाब लक्षात घेऊन महावितरणने तातडीने या सर्व यंत्रणेची दुरुस्ती करावी, अशी आग्रही मागणी संगमनेर नगरपरिषदेचे नगरसेवक योगेश जाजू यांनी केली आहे.

शहरातील मुख्य रस्ते, निवासी वस्त्या आणि बाजारपेठेच्या परिसरात महावितरणचे अनेक डीपी बॉक्स उघडे पडले आहेत. अनेक ठिकाणी रोहित्रांचे दरवाजे तुटलेले असून, त्यातील जिवंत वीजवाहिका उघड्यावरच लोंबकळत आहेत. त्यातच अनेक भागांतील विजेचे खांब धोकादायक पद्धतीने वाकले असून, वीजवाहक तारा जमिनीच्या अगदी जवळ आल्या आहेत. पावसाळ्यात वादळी वाऱ्यामुळे या तारा तुटून पडणे किंवा उघड्या डीपींमध्ये पाणी जाऊन संपूर्ण परिसरात वीजप्रवाह (करंट) उतरण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे.

**जीवितहानी झाल्यास महावितरण जबाबदार -** पावसाळ्यात उघड्या डीपींमुळे आणि लोंबकळणाऱ्या तारांमुळे नागरिकांच्या, विशेषतः लहान मुलांच्या आणि पाळीव प्राण्यांच्या जिवाला मोठा धोका निर्माण झाला आहे. महावितरणने पावसाळ्यापूर्वी मान्सूनपूर्व कामे



करणे गरजेचे होते. मात्र, अद्यापही अनेक ठिकाणी परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. प्रशासनाने तातडीने वाकलेले खांब सरळ करावेत, तारांचा ताण वाढवावा आणि (पान ४वर)










Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा

- अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
- माफक दरात - संगमनेर येथेच
- 105 बेड्स
- तज्ञ डॉक्टर्स
- अत्याधुनिक सुविधा

कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध

हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग

सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33

पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना

9953299532 आजच संपर्क करा

24/7 Emergency Services


संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




# घरगुती गॅस आणखी महागणार

## केंद्र सरकारचा इशारा



मुंबई (वृत्तसंस्था)

देशातील सर्वसामान्य नागरिकांना महागाईचा आणखी एक मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. घरगुती एलपीजी गॅस सिलेंडरच्या किमतीत नुकतीच वाढ झाली असतानाच, येणाऱ्या काळात गॅस आणखी महाग होणार असल्याचे संकेत केंद्र सरकारनं दिले आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर सुरू असलेल्या भू-राजकीय तणावामुळे आणि पुरवठा साखळीतील अडथळ्यांमुळे एलपीजी गॅसच्या किमतींवर प्रचंड दबाव निर्माण झाला आहे. केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी या वाढत्या महागाईवर सरकारची बाजू स्पष्ट करताना, आगामी काळात पेट्रोल-डिझेलसह गॅस सिलेंडरचे दर आणखी वाढू शकतात, असं स्पष्ट केलं आहे.केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी वाढत्या दरांवर स्पष्टीकरण देताना जागतिक संकटाचा दाखला दिला. ते म्हणाले की, गॅस सिलेंडरच्या किमती वाढल्यामुळे आम्हालाही दुःख आणि खेद आहे. मात्र, यावर टीका करण्यापूर्वी लोकांनी जगातील सद्यस्थिती समजून घेतली पाहिजे. सध्या संपूर्ण जग गंभीर संकटाचा सामना करत आहे. जगभरात मालाची वाहतूक आणि पुरवठा साखळी पूर्णपणे विस्कळीत झाली आहे.

प्रल्हाद जोशी पुढे म्हणाले की, एलपीजी गॅस आता अत्यंत मर्यादित ठिकाणांवरून उपलब्ध होत आहे. गॅसची मूळ किंमत वाढली आहे. शिवाय, माल एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहोचवण्यासाठी आता तब्बल ४० ते ४५ दिवस लागत आहेत, ज्यामुळे वाहतुकीचा खर्च आणि विम्याचा खर्च कमालीचा वाढला आहे. आम्ही सर्वसामान्य जनतेच्या अडचणींबाबत तितकेच चिंतित आहोत, परंतु सध्याच्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीमध्ये गॅसच्या किमती वाढवणे हा सरकारचा नाईलाज झाला असल्याचं केंद्रीय मंत्र्यांनी स्पष्ट केलं. आहे.

नुकतंच ७ जून रोजी घरगुती एलपीजी गॅस सिलेंडरच्या किमतीत प्रति सिलेंडर २९ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. या ताज्या दरवाढीनंतर आता मुंबईमध्ये १४.२ किलोच्या घरगुती गॅस सिलेंडरची किंमत ९४२ रुपयांवर पोहोचली आहे.

यापूर्वी कमर्शियल गॅस सिलेंडरच्या दरांमध्येही मोठी वाढ नोंदवली गेली होती. यामुळे हॉटेल व्यावसायिक, केटरर्स आणि खाद्यपदार्थांशी निगडित व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांमध्ये आधीच प्रचंड चिंतेचे आणि तणावाचे वातावरण आहे. आता घरगुती गॅस सिलेंडरचे दर पुन्हा वाढणार असल्याने गृहिणींचे बजेट पूर्णपणे कोलमडणार असल्याचे चित्र आहे.

## 'उज्वला' धारकांना आता चारच सिलेंडर

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

उज्वला योजनेअंतर्गत लाभार्थींचा वार्षिक सरासरी वापर चार ते पाच एलपीजी सिलिंडरचाच असल्याचा दावा करत केंद्र सरकारने त्यांना १४.२ किलोच्या घरगुती एलपीजी सिलिंडरवर दिले जाणारे तीनशे रुपयांचे अतिरिक्त अंशदान (सबसिडी) यापुढे नऊऐवजी चारच सिलिंडरवर देण्याचा निर्णय आज जाहीर केला. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव प्रवीण खनुजा यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

सर्वसामान्य ग्राहकांना बाजारातील भावानुसार घरगुती सिलिंडरचे पूर्ण ९४२ रुपये द्यावे लागतात. उज्वला योजनेच्या लाभार्थींना त्यावर मिळणारे तीनशे रुपयांचे अंशदान थेट त्यांच्या बँक खात्यात जमा केले जाते. वर्षाला जास्तीत जास्त नऊ सिलिंडरपर्यंतच मिळणारे हे अंशदान आता केवळ चार सिलिंडरवरच मिळणार आहे.

# ठेकेदारावर कारवाई करा, रस्ता पूर्ण करा; ग्रामस्थांची मागणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले- तालुक्यातील दुर्गम भागातील समशेरपूर - पागिरवाडी- शेरणखेल रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली असून या रस्त्याकडे ठेकेदार व प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. या रस्त्याच्या दुरावस्थेमुळे विद्यार्थ्यांचे प्रचंड शैक्षणिक नुकसान होणार आहे. त्यामुळे तातडीने या रस्त्याचे काम पूर्ण करावे अन्यथा मुथाळणे-पागिरवाडी चे ग्रामस्थ तहसील कार्यालयासमोर मोठे आंदोलन करणार असल्याचा इशारा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा मुथाळणे गावचे उप सरपंच चक्रधर सदगीर यांनी दिला आहे. या रोडचे काम दोन ठेकेदारांनी घेतले असल्याचे समजते. या रस्त्याचे उदघाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले मात्र दोन वर्षे होऊनही या रस्त्याच्या कामात फारसी प्रगती दिसून येत नाही.

रस्त्याची दुरावस्था व काम अपूर्णतेमुळे या भागात एस टी बस सुरू करण्यास अधिकारी वर्गाने नकार दिला आहे. त्यामुळे शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना एस टी बस नसल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान मोठ्या प्रमाणावर होण्याची भीती पालक वर्गाने व्यक्त केली. तसेच या समशेरपूर शेरणखेल रस्त्याचे काम करण्यासाठी ठेकेदाराने एक वर्षापूर्वी रस्त्याच्या कडेला खडी आणून टाकली आहे.त्यामुळे प्रवासी वाहतुक करणाऱ्या वाहने,बस यांना या रस्त्यावरून वाहन चालविणे कसरतीचे झाले आहे.या रस्त्याचे बीबीएम चे काम करावे म्हणून मुथाळणे ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांना निवेदन दिले ,मात्र शासन निधी देत नाही।म्हणून काम बंद आहे अशी उडवाउडवीची उत्तरे अधिकारी देत असल्याचा आरोप चक्रधर सदगीर यांनी केला आहे.

शासन नियमाप्रमाणे पात्र ठेकेदाराला काम देण्याची पद्धत असून काम पूर्ण झाल्यावर शासन त्यांचे बिलाची रक्कम अदा करीत असते असे असताना ठेकेदार निधी नाही म्हणून या रस्त्याचे काम पूर्ण करीत नाही. अशा सर्व परिस्थितीत रस्त्यावर पडलेले मोठमोठे खड्डे व खडी टाकल्यामुळे अरुंद झालेला रस्ता व त्याची दुरावस्था पाहून अकोले आगाराने या मार्गावरची बस सेवा बंद केली आहे.त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे तर महिला वृद्ध नागरिकांचे हाल होत आहे. व अपघात होण्याची शक्यता असल्याने या रस्त्यावर पडलेली खडी उचलून नेण्यात यावी.व रस्ता सध्या मोकळा करावा अशी मागणी ग्रामस्थ करीत आहे.समशेरपूर- पागीरवाडी- शेरणखेल हा रस्ता घाट रस्ता असून एका बाजूला तीव्र उतार आहे तर वळणे जास्त असल्याने या रस्त्याने वाहन चालविताना वाहन चालकांना कसरत करावी लागते. जर या रस्त्याने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी कोणताही अडथळा शिवाय वाहन चालवून दाखविल्यास त्यांचा योग्य तो सत्कार करण्यात येईल व त्यांना योग्य ते बक्षीस देण्यात येईल असे जाहीर केल्याचे उपसरपंच चक्रधर सदगीर यांनी सांगितले. आढळा विभागाकडे लोकप्रतिनिधी दुर्लक्ष करीत असून या कडे लोकप्रतिनिधी व पालकमंत्री यांनी लक्ष घालावे व ठेकेदार या रस्त्याचे काम पूर्ण करीत नसेल तर त्याचे नाव काळ्या यादीत टाकावे व दुसऱ्या ठेकेदाराकडून काम पूर्ण करून घ्यावे अशी मागणी मुथाळणे ग्रामस्थांनी केली आहे.अन्यथा या साठी मोठे आंदोलन करण्याचा इशारा चक्रधर सदगीर यांनी दिला आहे

# संगमनेरात संविधान अमृत महोत्सवाचा भव्य सोहळा

## ७५ बौद्ध उपासकांचा 'महाराष्ट्र रत्न पुरस्काराने गौरव

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- भारतीय संविधानाच्या ७५ व्या वर्षानिमित्त संगमनेर येथे आयोजित करण्यात आलेला संविधान अमृत महोत्सव आणि राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न पुरस्कार २०२६ हा सोहळा महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आंबेडकरी चळवळीच्या इतिहासातील अविस्मरणीय ठरला. तेजस सेवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. रविंद्र विठ्ठल घोसाळे यांच्या संकल्पनेतून गुरुवार, दि. ४ जून २०२६ रोजी मालपाणी लॉन्स येथे हा ऐतिहासिक कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या संगमनेर नगरीत झालेल्या या सोहळयास राज्यातील ३६ जिल्ह्यांतून हजारो आंबेडकरी अनुयायी उपस्थित होते. संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त इतिहासप्रसिद्ध कुटुंबांच्या वारसदारांसह महाराष्ट्रभरातील ७५ बौद्ध उपासक-उपासिकांचा महाराष्ट्र रत्न पुरस्कार २०२६ देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. ए. सुमेध बोधीजी (राष्ट्रीय महासचिव, भिक्खू संघ, चैत्यभूमी दादर, भारतीय बौद्ध महासभा) यांच्या धम्ममय मार्गदर्शनातून अत्यंत प्रेरणादायी वातावरणात झाली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे माजी मंत्री तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सहकारी दादासाहेब रुपवते यांचे सुपुत्र आणि ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ संघराज रुपवते होते. प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ, लेखक व सामाजिक कार्यकर्ते



प्रा. मुकुंद भारसाकळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि समाज उत्कर्षाची मूलतत्त्वे या विषयावर विचारप्रवर्तक व्याख्यान देत उपस्थितांना संविधानिक मूल्यांचे महत्त्व पटवून दिले.

कार्यक्रमाचे उद्घाटन राज्याचे माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार डॉ. किरण लहामटे, डॉ. रविंद्र घोसाळे, ज्येष्ठ आंबेडकरी नेते माणिकराव यादव आणि राज्यातील ज्येष्ठ आंबेडकरी नेते विजयराव वाकचौरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

सर्व मान्यवरांनी आपल्या भाषणातून भारतीय संविधान, सामाजिक न्याय, समता आणि बंधुता या मूल्यांचा जागर करण्याचा संदेश दिला. संविधानाने दिलेल्या अधिकारांची जाणीव ठेवून समाज परिवर्तनासाठी कार्यरत राहण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ज्येष्ठ आंबेडकरी कार्यकर्ते सूर्यकांत शिंदे यांनी माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या माध्यमातून विशेष सहकार्य केले. तसेच उद्योजक कल्पित वाकचौरे, डॉ. ज्ञानेश्वर अहिरे, प्रा. डॉ. कल्पना सांगोडे, प्रा. गंगाधर लांडगे यांच्यासह संविधान समितीतील अनेक मान्यवरांनी मोलाची भूमिका बजावली.

विशेष म्हणजे, तेजस घोसाळे आणि भूषण घोसाळे यांनी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कार्यक्रमाचे नियोजन, व्यवस्थापन आणि सादरीकरण अत्यंत प्रभावीपणे पार पाडत सोहळ्याची उंची आणखी वाढवली. तर ज्येष्ठ निवेदक सतीश खरात यांनी आपल्या ओघवत्या आणि मार्मिक सूत्रसंचालनातून उपस्थितांची मने जिंकली.

# एकल महिलांचे धोरण तळागाळापर्यंत पोहोचवा

## साऊ एकल महिला समितीचे शिर्डी शिबिरात अनेक संकल्प

युवावार्ता (प्रतिनिधी)

शिर्डी-राज्य शासनाने नुकतेच एकल महिलांचे धोरण तयार करण्यासाठी मसुदा समिती गठीत केली आहे. हे धोरण लवकरच येत असल्याने ते तळागाळातील महिलांपर्यंत पोहोचवण्यासाठी कार्यकर्त्यांची जबाबदारी वाढली आहे. यासाठी संघटनात्मक बांधणी महत्त्वाची असून कार्यकर्त्यांनी जास्तीत जास्त वेळ द्यावा असे आवाहन साऊ एकल महिला समितीचे राज्य निमंत्रक हेरंब कुलकर्णी यांनी केले.



महात्मा जोतीराव फुले यांच्या २०० व्या जयंती वर्षाचे औचित्य साधून शिर्डी येथे साऊ एकल महिला समितीचे दोन दिवसीय राज्यस्तरीय शिबिर पार पडले. या शिबिरात एकल महिलांच्या कागदपत्रांच्या अडचणी, संजय गांधी निराधार योजना, बालसंगोपन योजना, रोजगार, मालमत्ता हक्क आणि पुनर्विवाह अशा विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली. शेतीपूरक व्यवसायाच्या संधींबाबत सह्याद्री फार्मचे संस्थापक विलास शिंदे यांनी, तर पोटगीच्या अडचणी आणि प्रलंबित न्यायालयीन खटल्यांबाबत ॲड. किरण जपे अवताडे यांनी मार्गदर्शन केले.

सध्या ९२ तालुक्यांत असलेले समितीचे काम पुढील वर्षात किमान २०० तालुक्यांपर्यंत विस्तारण्याचा संकल्प कार्यकर्त्यांनी जाहीर केला. तसेच जिल्हा समन्वयकांनी काम वाढवण्याबाबतची रणनीती मांडली. यावेळी मिलिंदकुमार साळवे, मुकुंद टंकसाळे, अश्विनी अवताडे, जुल्फीकार काझी, कारभारी गरड आणि अशोक कुटे यांनी विविध विषयांवर अभ्यासपूर्ण सत्रे घेतली. शिबिरास गडचिरोली, भंडारा, अमरावती, यवतमाळ, वर्धा, हिंगोली, नागपूर, नांदेड, कोल्हापूर, जळगावसह २५ जिल्ह्यांतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिबिराची सांगता पुणे येथील राखी रासकर यांनी सादर केलेल्या सावित्रीबाई फुले यांच्यावरील काव्यगायनाने झाली. महात्मा फुले आणि सावित्रीबाई यांनी विधवा महिलांसाठी केलेले काम पुढे नेण्याच्या भावनेतून कार्यकर्त्यांनी संघटनात्मक पातळीवर विविध समित्यांची स्थापना करून पदाधिकारी निवडले.

# जिल्हा वार्षिक योजनेतील विकासकामांचे नियोजन तातडीने सादर करा - जिल्हाधिकारी

जिल्हा माहिती कार्यालय

अहिल्यानगर - जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यात विविध विकासकामे करण्यात येत असून, मंजूर निधीतून करण्यात येणाऱ्या कामांचे नियोजन तातडीने सादर करण्यात यावे. तसेच, गतवर्षातील प्रलंबित कामे आणि 'स्पिल' (मागील वर्षाची अपूर्ण कामे) कामांच्या मागणीची माहिती संबंधित विभागांनी विलंब न करता उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या आढावा बैठकीत डॉ. आशिया बोलत होते. बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी सांगितले की, जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून हाती घेण्यात येणारी विकासकामे नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहेत. मंजूर निधीचा प्रभावी आणि वेळेत वापर होण्यासाठी प्रत्येक विभागाने कामांचे नियोजन काटेकोरपणे तयार करावे. गतवर्षातील अपूर्ण व प्रलंबित कामे तसेच 'स्पिल-ओव्हर' कामांच्या मागणीचे



प्रस्ताव तातडीने सादर करावेत. पावसाळा जवळ आला असल्याने, पावसाळ्यापूर्वीची कामे गतीने पूर्ण करण्यावर विशेष भर द्यावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

शासनाचे सौर ऊर्जेच्या वापराला प्राधान्य असून, जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालये टप्प्याटप्प्याने सौरऊर्जा कार्यान्वित करण्यात यावीत. ऊर्जा बचत आणि पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने सौर ऊर्जेचा वापर वाढविणे आवश्यक आहे. प्रत्येक विभागाने त्यांना मंजूर करण्यात आलेल्या निधीसंदर्भात तांत्रिक मान्यता घेऊन, प्रशासकीय मान्यतेसाठीचे प्रस्ताव तातडीने सादर करावेत. विकासकामांच्या अंमलबजावणीत अनावश्यक विलंब होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

बैठकीत विविध विभागांच्या विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. मंजूर निधी, प्रलंबित कामे, प्रस्तावांची सद्यस्थिती तसेच आगामी नियोजनाबाबत संबंधित विभागांकडून माहिती सादर करण्यात आली.

# 'जय भवानी, जय शिवराय'च्या घोषणांनी दुमदुमला विश्रामगड

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- गड-किल्ल्यांच्या पवित्र भूमीत पुन्हा एकदा शिवचरित्राचा जयघोष घुमला आणि इतिहास जिवंत झाला. किल्ले विश्रामगड येथे आज शिवराज्याभिषेक सोहळा अत्यंत भक्तिभाव, शिस्त आणि उत्साहात साजरा करण्यात आला. सिन्नर येथील रौद्र प्रतिष्ठान यांच्या वतीने आयोजित केलेला हा पहिल्या वर्षाचा सोहळा शिवप्रेमींसाठी अविस्मरणीय ठरला.

या भव्य सोहळ्यासाठी संगमनेर येथून १२ शिलेदारांनी विशेष सहभाग नोंदवला. या शिलेदारांमध्ये शिवव्याख्याते दिपकराव कर्पे, डॉ. महादेव अरगडे, संतोष शेळके, सुखदेव इल्हे , सुभाष घनदाट , पी. डी.सोनावणे यांसह अन्य शिवप्रेमींचा सहभाग होता.

गडावर पोहोचताच टाळ, ढोलकी,संभळ आणि पखवाज गजरात वातावरण पूर्णपणे शिवमय झाले. पारंपरिक वाद्यांच्या साथीने शिवभक्त कलाकहर भजनी मंडळ यांनी सादर केलेली शिवभक्तीपर गीते उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होती.

या कार्यक्रमात एक विशेष भावनिक क्षण पाहायला मिळाला, जेव्हा एका दिव्यांग शिवप्रेमीने छत्रपती शिवाजी महाराजांवर आधारित अत्यंत सुंदर व मन हेलावून टाकणारे गाणे सादर केले. त्याच्या सादरीकरणाने संपूर्ण गड परिसर स्तब्ध झाला आणि उपस्थितांच्या डोळ्यांत अभिमान व भावनांचे अश्रू दाटून आले. कार्यक्रमातील एक विशेष आकर्षण म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज हरवलेत का?



या विषयावर सादर केलेले प्रभावी नाट्य. या नाटिकेमधून आजच्या तरुण पिढीसमोर इतिहासाची जाणीव करून देत शिवचरित्राचे वास्तव आणि प्रेरणादायी पैलू अत्यंत ठळकपणे मांडण्यात आले. यानंतर प्रसिध्द शिवव्याख्याते दिपकराव कर्पे यांनी विश्रामगडाचा इतिहास, 'छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य तसेच शिदोजी निंबाळकर' यांचे बलिदान यावर सखोल व प्रभावी मार्गदर्शन केले. त्यांच्या ओघवत्या आणि अभ्यासपूर्ण मांडणीमुळे उपस्थित शिवप्रेमी भारावून गेले. संपूर्ण कार्यक्रमात शिवभक्ती, इतिहासाभिमान आणि सांस्कृतिक जागर यांचा सुंदर संगम पाहायला मिळाला. गड परिसरात दिवसभर जय शिवराय च्या जयघोषांनी वातावरण भारावून गेले होते.

# संपादकीय...

### जागतिक नेत्रदान दिन

## अंधारातून प्रकाशाकडे नेणारी जीवनदायी चळवळ

१० जून हा दिवस संपूर्ण जगात जागतिक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो. समाजात नेत्रदानाविषयी जागरूकता निर्माण करणे, नेत्रदानाचे महत्त्व पटवून देणे आणि अधिकाधिक लोकांना या पवित्र कार्यासाठी प्रेरित करणे हा या दिवसामागील मुख्य उद्देश आहे. अनेक अंध व्यक्तींच्या आयुष्यात प्रकाश आणण्यासाठी आयुष्यभर कार्य करणारे नेत्रविशारद डॉ. रामचंद्र लक्ष्मण भालचंद्र यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस साजरा केला जातो. त्यांनी केलेल्या सेवेमुळे हजारो लोकांना दृष्टी लाभली आणि अनेक कुटुंबांच्या जीवनात आनंद निर्माण झाला. त्यामुळे नेत्रदानाच्या चळवळीमध्ये त्यांचे योगदान विशेष महत्त्वाचे मानले जाते. मानवी शरीरातील डोळे हे सर्वात मौल्यवान ज्ञानेंद्रिय मानले जाते. आपण या सुंदर जगातील रंग, निसर्ग, माणसे, कला आणि विविध अनुभव डोळ्यांच्या माध्यमातूनच पाहू शकतो. आपल्या एकूण ज्ञानापैकी बहुतांश ज्ञान दृष्टीच्या माध्यमातून मिळते. त्यामुळे डोळ्यांशिवाय जीवनाची कल्पना करणेही कठीण आहे. परंतु जगात लाखो लोक असे आहेत की ज्यांना हे सुंदर जग पाहण्याचे भाग्य लाभलेले नाही. काही जण जन्मतःच दृष्टिहीन असतात, तर काहींना अपघात, संसर्ग, आजार किंवा इतर कारणांमुळे दृष्टी गमवावी लागते. अशा व्यक्तींसाठी नेत्रदान हे आशेचा किरण ठरते. आजच्या आधुनिक युगात बदलती जीवनशैली, प्रदूषण, वाढलेला स्क्रीन टाइम, मानसिक तणाव आणि विविध आरोग्य समस्या यांमुळे डोळ्यांच्या आजारांचे प्रमाण वाढत आहे. अनेकांना लहान वयातच चष्मा लागतो, तर काहींना गंभीर नेत्रविकारांना सामोरे जावे लागते. मात्र दृष्टी गमावलेल्या व्यक्तींच्या समस्या अधिक गंभीर असतात. त्यांना दैनंदिन जीवनातील साध्या गोष्टींसाठीही इतरांवर अवलंबून राहावे लागते. अशा वेळी एखाद्या व्यक्तीने केलेले नेत्रदान त्यांच्या आयुष्यात मोठा बदल घडवून आणू शकते. नेत्रदान म्हणजे मृत्यूनंतर आपल्या डोळ्यांचा उपयोग दुसऱ्या दृष्टिहीन व्यक्तीला दृष्टी देण्यासाठी करणे. अनेकांच्या मनात नेत्रदानाबाबत विविध गैरसमज आहेत. काहींना वाटते की नेत्रदानासाठी संपूर्ण डोळा काढला जातो किंवा विशिष्ट आजार असलेल्या व्यक्तींना नेत्रदान करता येत नाही. प्रत्यक्षात नेत्रदानामध्ये मुख्यतः डोळ्याच्या कॉर्निया या पारदर्शक भागाचा उपयोग केला जातो. चष्मा वापरणाऱ्या, मोतीबिंदूची शस्त्रक्रिया झालेल्या तसेच मधुमेह असलेल्या व्यक्तीदेखील नेत्रदान करू शकतात. त्यामुळे समाजातील बहुतांश व्यक्ती या महान कार्यात सहभागी होऊ शकतात. भारतातील कायद्यानुसार नेत्रदान हे मरणोत्तर केले जाते. इच्छुक व्यक्तीने जवळच्या नेत्रपेढीत जाऊन नेत्रदानाची नोंदणी करू शकते. मात्र एखाद्या व्यक्तीने पूर्वनोंदणी केलेली नसली तरी तिच्या मृत्यूनंतर कुटुंबीयांच्या संमतीने नेत्रदान करता येते. मृत्यूनंतर साधारणपणे सहा तासांच्या आत नेत्रदानाची प्रक्रिया पूर्ण करावी लागते. त्यानंतर मिळालेला कॉर्निया योग्य रुग्णाला प्रत्यारोपित केला जातो. त्यामुळे एखाद्या दृष्टिहीन व्यक्तीला पुन्हा जग पाहण्याची संधी मिळू शकते. नेत्रदान हे केवळ वैद्यकीय उपचाराचे साधन नाही, तर मानवतेचे सर्वोच्च प्रतीक आहे. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याचे डोळे दुसऱ्या व्यक्तीच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करतात. ज्याने कधी सूर्योदय पाहिला नाही, आई-वडिलांचा चेहरा पाहिला नाही किंवा निसर्गाचे सौंदर्य अनुभवले नाही, अशा व्यक्तीला दृष्टी मिळणे हा त्याच्यासाठी नवजीवनाचा अनुभव असतो. त्यामुळे नेत्रदानाचे सामाजिक आणि भावनिक महत्त्व खूप मोठे आहे. आजही भारतात कॉर्निया प्रत्यारोपणाची गरज असलेल्या रुग्णांची संख्या मोठी आहे. मात्र त्याच्या तुलनेत नेत्रदानाचे प्रमाण कमी आहे. याचे मुख्य कारण म्हणजे जनजागृतीचा अभाव आणि समाजातील गैरसमज. त्यामुळे प्रत्येकाने नेत्रदानाबाबत योग्य माहिती घेणे आणि आपल्या कुटुंबीयांनाही याविषयी जागरूक करणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था आणि आरोग्य यंत्रणांनीही या विषयावर सातत्याने जनजागृती करणे गरजेचे आहे. जागतिक नेत्रदान दिन हा केवळ एक दिवस साजरा करण्याचा कार्यक्रम नसून समाजात संवेदनशीलता आणि मानवतेची भावना रुजविण्याची संधी आहे. आपण मृत्यूनंतर आपल्यासोबत काहीही घेऊन जाऊ शकत नाही, परंतु आपल्या डोळ्यांच्या माध्यमातून एखाद्याच्या आयुष्यात कायमचा प्रकाश निर्माण करू शकतो. म्हणूनच आजच्या या दिवसाचे औचित्य साधून प्रत्येकाने नेत्रदानाचा संकल्प करणे आवश्यक आहे.

## संगमनेरमध्ये भेसळखोरीवर...

पान १ वरून -

दुकानांवर कोणतीही मोठी कारवाई केल्याचे समोर आले नसल्याने नागरिकांमध्येही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे शिवसेना (ठाकरे) पक्षाच्या वतीने अन्न व औषध प्रशासनाने त्वरित कारवाई करावी अशी मागणी उपजिल्हाप्रमुख अमर कतारी, शहरप्रमुख फैसल सय्यद, तालुकाप्रमुख भीमाशंकर पावसे, विधानसभाप्रमुख योगेश खेमनर, व्यापारी आघाडीप्रमुख संभव लोढा, इम्तियाज शेख, वाहतूकसेनाप्रमुख अशोक बढे, मघाडे, मोरे, अमोल डुकरे, प्रकाश गायकवाड, अमित फटांगरे, उपजिल्हाप्रमुख रंगनाथ फटांगरे, जिल्हा संघटक पप्पूशेठ कानकाटे यांनी केली.

## अधिकमासानिमित्त विष्णुयाग भक्तिभावात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अधिकमासाचे औचित्य साधत ब्राह्मी स्त्री मंचच्या वतीने शहरातील ज्ञानेश्वर महाराज मंदिर येथे विष्णुयागाचे आयोजन करण्यात आले. धार्मिक वातावरणात आणि भक्तिभावपूर्ण उत्साहात हा सोहळा संपन्न झाला. या यागासाठी यजमान म्हणून पराग सराफ, आप्पाशेठ कोळपकर, हेरंब कोळपकर, विजय कुलकर्णी, आशिष कांबळे, मते व उमरजी हे सपत्नीक सहभागी झाले होते. यावेळी भगवान पुरुषोत्तमाची सहस्र तुलसीदलांनी विशेष अर्चना करण्यात आली. तसेच विविध धार्मिक विधी आणि पूजाविधी मोठ्या श्रद्धा व भक्तिभावाने पार पडले.

सोहळ्यादरम्यान रमेश सराफ, अर्चना सराफ, वैद्य, वैभव कुलकर्णी यांच्यासह अनेक भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ज्ञानेश्वर महाराज मंदिर ट्रस्टचे मोलाचे योगदान लाभले. ट्रस्टचे विश्वस्त रमेश सराफ, नंदकुमार सराफ, आमोद सराफ, विश्वजीत सराफ आणि केदार सराफ यांनी सोहळ्याच्या परिपूर्णतेसाठी विशेष सहकार्य केले. विष्णुयागाचे पौरोहित्य वैभव गुरु उपासनी यांनी केले. त्यांना हृषीकेश मुळे, समीर सराफ, अरुण कुलकर्णी तसेच ब्रह्मवृंदाचे सहकार्य लाभले.

ब्राह्मी स्त्री मंचच्या मीनल जोशी, अमृता सराफ, स्वाती उपासनी, वैशाली कुलकर्णी, स्वप्ना संत, गीता सराफ, दीपाली उपासनी, सुप्रिया मंडलिक, प्राची मुळे यांच्यासह सर्व सदस्यांनी सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. धार्मिक श्रद्धा, सामूहिक सहभाग आणि भक्तिमय वातावरणामुळे हा विष्णुयाग संगमनेरकरांसाठी विशेष आकर्षण ठरला.

## "कुंकू पुसलं कर्जानं" लवकर आपल्या भेटीला

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अकोले महाराष्ट्र भूषण कलागौरव पुरस्कार प्राप्त, अकोले तालुक्यातील गणोरे गावातील रहिवासी व संगमनेर तालुक्याचे भूमिपुत्र चित्रपट निर्माते काशिनाथ आव्हाड गणोरेकर यांचा मराठी चित्रपट कुंकू पुसलं कर्जानं लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.

या चित्रपटामध्ये अभिनेते काशिनाथ आव्हाड गणोरेकर प्रथमच गोंधळयाच्या मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. चित्रपटाच्या सहनिर्मात्या जीविका सोनार असून दिग्दर्शन दाऊद बाबू शेख यांनी केले आहे. सहदिग्दर्शन सागर साठे व नंदा बागुल संगमनेरकर यांनी केलेले असून चित्रपट सृष्टीतील नामवंत कलाकारांनी या चित्रपटात काम केलेले आहे. चित्रपट कलावंत प्रकाश धोत्रे (बाळूमामा फेम), उज्वला पाटील, समृद्धी गटकळ, सेजल सातपुते, प्रसाद कोळी, प्रज्ञा गोपाळे इत्यादी सहकलाकांनी काम केलेले आहे. चित्रपटाचे पोस्ट प्रोडक्शनचे काम ऑरेंज म्युझिक स्टुडिओ, नाशिक येथे पार पडलेले आहे.

काळजाचा ठाव घेणार कौटुंबिक आणि भावनिक चित्रपट कुंकू पुसलं कर्जानं लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याचे, निर्माते काशिनाथ आव्हाड गणोरेकर यांनी सांगितले. मीडिया पार्टनर डॉ. शाम जाधव, नाशिक सौ. संगीता मिसाळ ( पवार) अहिल्यानगर, मनीष कांतीलाल मुथा (पत्रकार) नाशिक रोड व प्रवीण मुरलीधर जाधव सामाजिक कार्यकर्ते पत्रकार रामभाऊ आवारे वनसगाव निफाड प्रसिद्धी प्रमुख लवकरच आपल्या सेवेमध्ये दाखल होत आहे जीवनाची व्यथा कर्जबाजारीने व्यापलेला कर्जातून मुक्तपणे राहण्यासाठी "कुंकू पुसलं कर्जानं " ह्या विविध भागातून चित्रपटाचे चित्रीकरण करण्यात आले असून त्यामध्ये सिन्नर, नाशिक, अकोले, गणोरे अशा येथील संपूर्ण करण्यात आले आहे.

## निझर्णेश्वर विद्यालय स्मार्ट शिक्षणाच्या दिशेने



युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर-

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने युथ बिल्ड फाउंडेशनच्या आर्थिक सहकार्यातून निझर्णेश्वर विद्यालय, कोकणगाव येथे अत्याधुनिक स्मार्ट बोर्ड वितरण सोहळा उत्साहात पार पडला. या उपक्रमामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक विकासाला नवी दिशा मिळाली आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विकासजी पानसरे उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विद्यालयास स्मार्ट बोर्डांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आनंदराव कढणे होते. यावेळी युथ बिल्ड फाउंडेशनचे सीएसआर डायरेक्टर सत्यजित कुलकर्णी, संदीप पंडित, स्वप्निल खंडारे, एम. एम. फटांगरे, रामदास राहाणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याध्यापिका सी. बी. रहाणे यांनी विद्यालयाच्या शैक्षणिक वाटचालीचा आढावा घेत युथ बिल्ड फाउंडेशनचे आभार मानले. यावेळी वक्त्यांनी डिजिटल शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत स्मार्ट बोर्डमुळे विद्यार्थ्यांचे आकलन, सर्जनशीलता आणि तांत्रिक कौशल्ये विकसित होण्यास मदत होणार असल्याचे सांगितले. प्रमुख अतिथी विकासजी पानसरे यांनी ग्रामीण आणि शहरी शिक्षणातील दरी कमी करण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे नमूद केले. स्मार्ट बोर्डच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना चित्रफिती, ॲनिमेशन आणि विविध डिजिटल साधनांच्या साहाय्याने अधिक प्रभावी शिक्षण देता येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात आनंदराव कढणे यांनी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आधुनिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगितले. या उपक्रमामुळे विज्ञान, गणित, भाषा आणि सामाजिक शास्त्रांसह विविध विषयांचे अध्यापन अधिक प्रभावी आणि आकर्षक होणार आहे.

## उघडे रोहित्रे...

पान १ वरून -

उघड्या डीपींना दरवाजे बसवून संरक्षक जाळ्या बसवाव्यात. या निष्काळजीपणामुळे कोणतीही दुर्घटना किंवा जीवितहानी झाल्यास त्याला सर्वस्वी महावितरण प्रशासन जबाबदार राहील, असा इशारा नगरसेवक जाजू यांनी दिला आहे. पावसाळ्यात वीज अंगावर पडणे किंवा करंट लागून दुर्घटना होण्याच्या घटना घडत असतात. संगमनेर शहरातील ही धोकादायक स्थिती पाहता स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप आणि भीतीचे वातावरण आहे. महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन, केवळ कागदोपत्री दुरुस्ती न दाखवता प्रत्यक्ष जमिनीवर तातडीने काम सुरू करावे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

## रॉकेल वितरण कागदावरच पुरवठादारांकडून उचल नाही

पुणे (वृत्तसंस्था)

राज्यभरात निर्माण झालेल्या गॅसटंचाईच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागात रॉकेलचे वितरण करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. परंतु, घाऊक विक्रेत्यांनी दिलेल्या मुदतीत रॉकेलची उचल केली नाही. त्यामुळे पुरवठादारांकडून स्वस्त धान्य दुकानांत शिधापत्रिकाधारकांना ररॉकेलचे वाटप होऊ शकले नसल्याचे समोर आले आहे. परिणामी ररॉकल वाटपाची घोषणा ही कागदोपत्रीच राहिली असल्याचे स्पष्ट झाले आहे. युद्धजन्य परिस्थितीत सर्वसामान्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने शिधापत्रिकाधारकांना रॉकेल देण्याचा निर्णय घेतला होता. राज्यासाठी ३७ लाख ४४ हजार लिटरचा कोटा निश्चित केला होता. त्यापैकी पुणे जिल्ह्यात दोन लाख चार हजार लिटर रॉकेलचा कोटा मंजूर झाला होता. जिल्हा प्रशासनाने यासाठी तीन पुरवठादारांना निश्चित केले होते. मात्र, विक्रेते आणि किरकोळ दुकानदार यांना मिळणाऱ्या कमिशनवरून वाद सुरू झाला. तो वाद मध्यंतरी मिटला.

त्यानंतरही विक्रेत्यांनी, किरकोळ दुकानदारांनी रॉकेलच्या कोट्याची रक्कम अगाऊ द्यावी, अशी मागणी लावून धरली. मात्र, आम्हालादेखील एक रुपया कमिशन मिळणार आहे, हे कमिशन तुटपुंजे असल्याचे सांगत स्वस्त धान्य दुकानदारांनी, तसेच परवानाधारकांनी रॉकेल कोटा घेण्यास नकार दिला. परिणामी, जिल्ह्यात रॉकेलचे वितरण झालेच नाही. रॉकेलचे हे वितरण करण्यासाठी सरकारने २० मे रोजीची मुदत दिली होती. या वादात ती मुदत उलटून गेली. दरम्यान, सरकारनेही यास मुदतवाढ दिली नाही.

## ज्ञानमाता विद्यालयात जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -ज्ञानमाता विद्यालय व ज्युनिअर कॉलेज संगमनेर येथील शालेय परिसरामध्ये पाच जून या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त राष्ट्रीय हरित सेनेच्या वतीने व सामाजिक वनीकरण विभाग यांच्या समन्वयाने शालेय परिसरात साग, करंज, कडुनिंब या वृक्षांचे रोपण करण्यात आले. यामध्ये शालेय विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग दर्शविला आहे. आपण सर्वजण दररोज अनुभवत असणारे जागतिक तापमान वाढ, हवामानातील बदल व त्याचा सर्व जीवसृष्टीवर होणारा परिणाम याचा विचार करता प्रत्येक नागरिकाने एक वृक्ष लावून त्याचे संवर्धन करणे काळाची नितांत गरज झाली आहे. म्हणूनच शासनाच्या वतीने राबवण्यात येणारे एक पेड मा के नाम या योजने अंतर्गत प्रत्येक विद्यार्थ्यांनी एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प जागतिक पर्यावरणा दिनानिमित्त करण्यात आला आहे. या वेळी हरित सेना शिक्षक संदीप सातपुते यांनी वृक्षारोपण काळाची गरज व त्यांचे संवर्धन आणि फायदे या विषयी विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. त्यातून पर्यावरण समृद्ध करण्यासाठीचा प्रयत्न केला जाईल असा विश्वास व्यक्त केला. या प्रसंगी सामाजिक वनीकरण विभाग वनरक्षक श्रीमती मीनाक्षी खेमनर, प्राचार्य फादर फ्रान्सिस पटेकर, उपप्राचार्या अर्चना डोंगरे, पर्यवेक्षक प्रशांत शहाराव, कनिष्ठ महाविद्यालय प्रभारी शारदा नवले, हरित सेना शिक्षक श्री संदीप सातपुते, प्रा.अमोल शिंदे आदी उपस्थित होते.


**पाहिजेत**
सार्थक ॲग्रोव्हेट या नामांकित कंपनी करिता
टेलीकॉलर महिला - २
ड्रायव्हर - २
नाशिक पुणे हायवे, छत्रपती चौक, घुलेवाडी, संगमनेर
९५५२५०६३६३

**भाड्याने देणे आहे**
संगमनेर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी
२००० स्क्वेअर फिट ३ मजले, एकूण ६००० स्क्वेअर फिट बांधकाम असलेली प्रशस्त इमारत भाड्याने देणे आहे
● पिण्यासाठी नगरपालिकेचे नळ कनेक्शन ● वापरासाठी स्वतंत्र बोरिंग सुविधा
● थ्री फेज लाईट कनेक्शन उपलब्ध ● व्यवसाय, ऑफिस, क्लासेस, हॉस्पिटल, इत्यादींसाठी उत्तम जागा
पत्ता : नाशिक – पुणे हायवे, सह्याद्री कॉलेजच्या पाठीमागे, संगमनेर, ता. संगमनेर , जि. अ.नगर
- संपर्क -
9822258458

**पाहिजेत**
संगमनेर मधील नामांकित कॅफेच्या मार्केटिंगसाठी अनुभवी प्रतिनिधी पाहिजे आहेत.
टू व्हिलर आवश्यक
9860049439

**घर विक्रीसाठी आहे**
अकोले-नाशिक बायपास रोड डेरे इंग्लीश शाळेजवळ संगमनेर येथे १५०० चौ फूट उत्तरमुखी २० फुटी रोड टच सर्व सोईनेयुक्त टायटल क्लिअर घर विकणे आहे
आशा पवार
8999362929

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**पाहिजेत**
श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर श्री गणेश टायर्स या फॉर्मसाठी
सेल्समन -3
सुपर कॅरी ड्रायव्हर - 1
कामाचा अनुभव आवश्यक
9423793758

**कामगार भरती**
अकाउंटंट - ०१ (स्त्री/पुरुष)
स्त्री/ पुरुष, टॅलीचे ज्ञान आवश्यक
सेल्समन- ०५ (पुरुष)
अनुभवी, संभाषण कौशल्य आवश्यक
वॉचमन- ०१
ठिकाण – रमेश डिपार्टमेंटल स्टोअर्स अशोक चौक, संगमनेर
9028342110
9262625962

**जागा भाड्याने देणे**
३ मजली
८०० स्क्वेफूट
ठिकाण - मोमीनपुरा चौक,फेमस शुज समोर, संगमनेर
9028342110

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६








# रामायणातील बंधुप्रेमाचा आदर्श समाजाने स्वीकारावा : ढोक महाराज

अखंड भारतवर्षात रामायण माहीत नाही असा माणूस शोधूनही सापडणार नाही. रामकथा ही केवळ ऐतिहासिक घटना नसून प्रत्येक कुटुंबाच्या जीवनाचा आरसा आहे. जीवनात पडणाऱ्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर रामायणात दडलेले आहे. देशाची अखंडता टिकवायची असेल तर प्रथम घरात, कुटुंबात, गावात, तालुक्यात आणि समाजात एकी निर्माण झाली पाहिजे असे मौलिक प्रतिपादन रामायणाचार्य ह.भ.प. रामराव ढोक महाराज यांनी केले.

अधिक मासानिमित्त प.पू. स्वामी गगनगिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताहात सुरू असलेल्या आठव्या पर्वातील राम कथेतील पहिल्या कथेच्या भागाचे निरूपण करताना ढोक महाराज यांनी रामायणातील जीवनमूल्यांचा उलगडा केला.

गोवर्धन पर्वत उचलताना श्रीकृष्णाला जशी प्रत्येक गोप सवंगड्याच्या काठीची साथ लाभली, त्याचप्रमाणे सप्ताह सोहळ्याच्या यशात योगदान देणारा प्रत्येक भाविक हा गोपाळच आहे, असे सांगत भाविकांच्या सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले.

रामायणातील बंधुप्रेमाचा आदर्श उपस्थितांसमोर ठेवताना त्यांनी सांगितले की, आज समाजाला सर्वाधिक गरज आहे ती भावा भावांमधील प्रेमाची.




ज्या घरात भावांमध्ये प्रेम, आपुलकी आणि एकोप्याचे वातावरण असते, त्या घरातील आई वडिलांना कोणत्याही औषधाची गरज भासत नाही. त्यांच्या विचारांनी उपस्थितांच्या मनाला स्पर्श केला.

रामचरितमानसाचे महत्त्व विशद करताना त्यांनी सांगितले की, गोस्वामी तुळशीदासांनी लिहिले म्हणून ते तुलसीरामायण झाले आणि रामाचे चरित्र असल्याने ते रामचरितमानस बनले. मानसरोवरात एकदा डुबकी मारल्यानंतर त्याचा आनंद जसा मनात साठवून ठेवला जातो, तसेच सप्ताहातील संतवाणीमधून भक्ती, संस्कार आणि जीवनमूल्ये आत्मसात केली पाहिजेत.

यावेळी त्यांनी शिव पार्वती विवाहाची कथा रसाळ शैलीत उलगडली. पद वाईट नसते, पण पदाचा अहंकार वाईट असतो असे सांगत दक्ष प्रजापतीच्या कथेद्वारे त्यांनी आजच्या सामाजिक व राजकीय परिस्थितीवर भाष्य केले. त्याग, समर्पण, कौटुंबिक नाती आणि कुटुंबव्यवस्थेतील स्त्रीचे महत्त्व यावरही त्यांनी प्रभावी विवेचन केले.

करपात्रे महाराज आणि डोंगरे महाराज यांच्या साधेपणाचा उल्लेख करताना संतांचे खरे वैभव त्यांच्या नम्रतेत आणि आचरणात असते असा संदेश त्यांनी दिला. तसेच पती पत्नींनी एकत्र बसून कथा श्रवण केल्यास कुटुंबातील नाती अधिक दृढ होतात असेही त्यांनी सांगितले. कथेच्या दरम्यान वीरभद्र, कार्तिकस्वामी आणि श्रीगणेश जन्मकथांचा उल्लेख करताना शिव पार्वती विवाह प्रसंगाचे त्यांनी आपल्या अमोघ वाणीने जिवंत चित्र उभे केले.

रामकथेच्या माध्यमातून धार्मिकते बरोबरच सामाजिक ऐक्य, बंधुभाव, कुटुंब वत्सलता आणि संस्कारांचा संदेश देणारा हा सोहळा भाविकांसाठी आत्मपरीक्षणाचा प्रेरणादायी अनुभव ठरला. संगमनेर व पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी रामकथेचा रसास्वाद घेत आध्यात्मिक आनंदाची अनुभूती घेतली.

# प्रफुल्ल खताळ यांची गृह मंत्रालयात निवड



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील धांदरफळ येथील शेतकरी कुटुंबातील प्रफुल्ल अशोक खताळ यांची भारत सरकारच्या केंद्रीय गृह मंत्रालयात प्रशासकीय अधिकारी (एक्झिक्युटिव्ह ग्रेड-२) या पदावर निवड झाली आहे.

प्रफुल्ल यांनी प्रवरा माध्यमिक शिक्षण संस्थेतून शालेय शिक्षण पूर्ण केले असून, पुणे येथे त्यांनी केमिकल इंजिनिअरिंगची पदवी घेतली आहे. त्यानंतर त्यांनी स्पर्धा परीक्षांची तयारी करत यूपीएससीच्या विविध परीक्षा उत्तीर्ण केल्या. यापूर्वी त्यांची कोल इंडियामध्येही निवड झाली होती. त्यांचे वडील अशोक सखाहरी खताळ हे शेतकरी, उद्योजक आणि सामाजिक कार्यकर्ते आहेत, तर त्यांच्या आई संस्थाचालक व शिक्षिका आहेत. प्रफुल्ल यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल ग्रामस्थ, शिक्षक, मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या निवडणुकीत मेघराज राजे भोसले विजयी

युवावार्ता (प्रतिनिधी)

शिर्डी - अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत मेघराज राजे भोसले यांनी दणदणीत विजय मिळविल्याने राज्यभरातील कलावंतांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यावेळी प्रमोद पंडीत म्हणाले, हा विजय केवळ एका पॅनलचा नसून मराठी चित्रपटसृष्टीतील कलावंतांनी दाखविलेल्या विश्वासाचा, एकजुटीचा आणि सकारात्मक विचारांचा विजय आहे. कलावंतांच्या न्याय्य हक्कांसाठी, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि संस्थेच्या उज्ज्वल भविष्यासाठी मेघराज

राजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली नव्या पर्वाची सुरुवात झाली आहे. मराठी चित्रपटसृष्टीतील कलाकार, तंत्रज्ञ आणि विविध क्षेत्रांतील कार्यकर्त्यांनी या निवडणुकीत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. निवडणुकीच्या निकालानंतर अनेक कलावंतांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून

तसेच प्रत्यक्ष भेटून विजेत्यांचे अभिनंदन केले. या विजयामुळे महामंडळाच्या कार्याला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

मेघराज राजे भोसले यांच्या विजयामुळे मराठी विविध चित्रपटसृष्टीतील प्रश्नांना न्याय मिळेल. तसेच कलावंतांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी प्रभावी पावले उचलली जातील, असा विश्वास अनेक कलाकारांनी व्यक्त केला आहे. या ऐतिहासिक विजयाचा आनंद साजरा करताना सर्व कलावंतांनी एकात्मतेचा



संदेश देत आगामी काळात संस्थेला अधिक सक्षम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# ना. विखे पाटलांच्या बंगल्याबाहेर मराठा आंदोलकांचा ठिय्या !

युवावार्ता (प्रतिनिधी)

मराठा आरक्षण आणि संबंधित मागण्यांच्या पूर्ततेसंदर्भात राज्य सरकारकडून होत असलेल्या दिरंगाईविरोधात मराठा आंदोलकांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. मराठा उपसमितीचे अध्यक्ष तथा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या बंगल्यावर आज आंदोलकांनी धडक देत ठिय्या आंदोलन केले. यामुळे राज्यातील मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. मराठा आंदोलनाचे कार्यकर्ते रमेश केरे पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विखे पाटील यांच्या निवासस्थानी जाऊन आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले. मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणानंतर सरकारने दिलेल्या आश्वासनांची अद्याप प्रभावी अंमलबजावणी झालेली नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. आंदोलकांचे म्हणणे आहे की, मराठा समाजासाठी घेतलेल्या निर्णयांची आणि दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यात सरकारकडून चालढकल केली जात आहे. त्यामुळे मराठा समाजामध्ये नाराजी वाढत असून, सरकारच्या भूमिकेबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणानंतर सरकारने काही शासन निर्णय जारी केले. मात्र, या निर्णयांमधील काही तरतुदींविषयी मराठा समाजात संभ्रम आणि नाराजी आहे.

# अटक केलेल्या मेडिकल चालकास पाच दिवसांची पोलीस कोठडी

युवावार्ता (प्रतिनिधी)

श्रीरामपूर - लोणी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या अवैध गर्भलिंग निदान चाचणी आणि बेकायदेशीर गर्भपात प्रकरणाच्या तपासात सहभागी असलेला एका मेडिकल चालक जालिंदर बोरुडे (वय ४०) अटक करुन न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याला पाच दिवसांची, पोलीस कोठडी सुनावली आहे.

पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे या गंभीर गुन्ह्याच्या तपासाला नवे वळण मिळाले असून, आतापर्यंत ६ डॉक्टरांसह एकूण १९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. श्रीगोंदा तालुक्यातील घोगरगाव येथील जालिंदर बोरुडे (वय ४०) याला ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून एक सोनोग्राफी मशीन आणि क्रेटा चारचाकी वाहन जप्त करण्यात आले आहे.

आरोपीला तपासादरम्यान बोरुडे याने नेमक्या किती बेकायदेशीर मर्भलिंग निदान चाचण्या केल्या, तो स्वतः डॉक्टर नसताना सोनोग्राफी मशीनचा वापर कसा करत होता, या गैरप्रकारात आणखी कोणाचा सहभाग आहे, तसेच या रॅकेटमधील एजंटांची साखळी किती व्यापक आहे, याचा सखोल तपास करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. यापूर्वी अटक करण्यात आरोपींकडून माहितीनुसार आलेल्या मिळालेल्या आणखी काही संशयितांची नावे समोर आली आहेत. त्यांच्याकडे चौकशी करणे अद्याप बाकी असून, तपासाचा फास आणखी आवळला जाण्याची शक्यता आहे.

तपास यंत्रणांच्या प्राथमिक निष्कर्षानुसार, बेकायदेशीररीत्या खरेदी केलेल्या सोनोग्राफी मशीनच्या माध्यमातून विविध ठिकाणी जाऊन गर्भलिंग निदान चाचण्या केल्या जात होत्या. या रॅकेटमध्ये काही एजंट, डॉक्टर आणि मेडिकल व्यवसायाशी संबंधित व्यक्तींचा सहभाग असल्याचेही उघड झाले आहे. संबंधित एजंटांकडून गर्भवती महिलांना या आरोपींचे संपर्क क्रमांक व पत्ते उपलब्ध करून दिले जात असल्याचे तपासात

समोर आले आहे. महिलांच्या गर्भातील बाळाचे लिंग निश्चित करण्यास कायद्याने बंदी असतानाही आर्थिक फायद्यासाठी अशा प्रकारचे अमानुष आणि बेकायदेशीर कृत्य सुरू असल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे या प्रकरणातील सर्व संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

दरम्यान, या प्रकरणांतील तपास वेगाने सुरू असून, गर्भलिंग निदानाच्या अवैध साखळीचा संपूर्ण पर्दाफाश काळात करण्यासाठी पोलीस आणि संबंधित यंत्रणा प्रयत्नशील आहेत. आगामी आणखी काही धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**विशेष म्हणजे या प्रकरणात अटक केलेल्या एकाही आरोपीला अद्यापपर्यंत जामीन मिळालेला नाही. गुन्ह्याचा तपास इतक्या बारकाईने सुरू आहे की, प्रत्येक आरोपी विरुद्ध सबळ पुरावे प्राप्त होत आहेत. त्यामुळे दीड महिन्याच्यावर कालावधी होऊनही कोणालाही जामीन झालेला नाही.**

**सोमनाथ वाघचौरे, अपर पोलीस अधिक्षक**

# शिवसेना ठाकरे गटाला धक्का

## शहरप्रमुख संगीता गायकवाड यांचा राजीनामा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शिव सेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या महिला आघाडीच्या संगमनेर शहरप्रमुख संगीता वसंतराव गायकवाड यांनी आपल्या पदाचा तडकाफडकी राजीनामा दिला आहे. वैयक्तिक कारणास्तव आपण हा निर्णय घेतल्याचे त्यांनी राजीनामा पत्रात नमूद केले आहे.

गायकवाड यांनी आपला राजीनामा महिला आघाडीच्या संपर्कप्रमुख बेबीताई लांडगे यांच्याकडे पाठवला आहे. काही दिवसांपूर्वी महिला आघाडीतील आशा केदारी



यांनीही राजीनामा दिला होता. त्यानंतर आता संगीता गायकवाड यांनीही पद सोडल्याने संगमनेरमधील शिवसेना ठाकरे गटात मोठी खळबळ उडाली आहे. सलग दुसरा राजीनामा समोर आल्याने पक्षाला स्थानिक पातळीवर मोठे खिंडार पडल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

येत्या आठ दिवसांत आणखी काही पदाधिकारी आणि कार्यकर्ते राजीनामे देण्याच्या तयारीत असल्याची चर्चा शहरात रंगू लागली आहे. या एकापाठोपाठ घडणाऱ्या घडामोडींमुळे शिवसेनेच्या स्थानिक संघटनात्मक ताकदीबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. मात्र, या राजीनामा सत्राबाबत पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही.

# पुस्तकांचे गाव' उपक्रमासाठी 30 जूनपर्यंत प्रस्ताव पाठवावेत - जिल्हाधिकारी डॉ. आशिया

जिल्हा माहिती कार्यालय-

अहिल्यानगर - वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी तसेच ग्रामीण भागात ज्ञानाचा प्रसार अधिक व्यापक करण्याच्या उद्देशाने राज्य मराठी विकास संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या 'पुस्तकांचे गाव' या महत्त्वाकांक्षी उपक्रमासाठी जिल्ह्यातून एका गावाची निवड करण्यात येणार असून इच्छुक ग्रामपंचायती, संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थांनी दि. ३० जून २०२६ पर्यंत प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा मराठी भाषा समितीचे अध्यक्ष डॉ. पंकज आशिया यांनी केले आहे.

राज्यात पुस्तकांचे गाव निर्माण करताना सहभागी होऊ इच्छिणाऱ्या मंडळांनी, देवस्थानांनी, ग्रामपंचायतींनी, संस्थांनी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांनी कोणत्याही आर्थिक लाभाची अपेक्षा न ठेवता या उपक्रमात सहभागी व्हावे. या उपक्रमात व्यापक लोकसहभाग असणे आवश्यक असून त्याबाबतचा उल्लेख स्थानिक स्वराज्य संस्थेच्या ठरावामध्ये असणे बंधनकारक आहे. प्रत्येक ग्रंथदालनाचे क्षेत्रफळ किमान १५० चौ. फूट असावे तसेच संबंधित जागा विनामूल्य उपलब्ध करून देणे आवश्यक राहील. यासाठी किमान पाच वर्षांचा करार करणे बंधनकारक राहणार आहे. गावातील परिस्थितीनुसार उपलब्ध दालनांची संख्या व आकारमान कमी-जास्त असू शकते. त्याबाबतचा अंतिम निर्णय राज्य मराठी विकास संस्था घेणार आहे.

'पुस्तकांचे गाव' निवडीसाठी शासनाने काही निकष निश्चित केले आहेत. त्यानुसार ही योजना फक्त ग्रामपंचायत, नगरपंचायत व 'क' वर्ग नगरपरिषद क्षेत्रात राबविण्यात येणार आहे. संबंधित ग्रामपंचायत, नगरपंचायत अथवा नगरपरिषदेचा ठराव आवश्यक राहील. शासनाने घोषित केलेली पर्यटनस्थळे, तीर्थक्षेत्रे, ऐतिहासिक वारसा असलेली गावे, राज्य किंवा केंद्र संरक्षित स्मारके असलेली गावे तसेच संत गाडगेबाबा, आदर्श गाव, तंटामुक्ती, पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आदी राज्यस्तरीय पुरस्कारप्राप्त गावांना प्राधान्य दिले जाणार आहे. तसेच साहित्यिक किंवा वाङ्मयीन चळवळीची परंपरा असलेल्या गावांचाही विचार केला जाणार आहे.

प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर जिल्हा मराठी भाषा समितीकडून प्रत्यक्ष पाहणी करून पात्रतेचा अहवाल सादर करण्यात येईल व त्यानंतर गावाची अंतिम निवड करण्यात येईल. निवड झालेल्या गावात सुरुवातीला किमान दहा ग्रंथदालने सुरू करण्यात येतील. या दालनांसाठी आवश्यक आवर्ती व अनावर्ती खर्च शासनाकडून करण्यात येणार आहे.

# महाराष्ट्र संघाने पटकावला 'राष्ट्रीय' क्रिकेट करंडक!

## देशभरातील सोळा संघांचा सहभाग; ध्रुव ग्लोबल स्कूलने केले प्रतिनिधीत्व

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - ५० बॉल फेडरेशन ऑफ इंडिया आणि ओडिशा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय पंधरा वर्षांखालील ५०-बॉल क्रिकेट स्पर्धेत महाराष्ट्र संघाने अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर शानदार विजेतेपद पटकावले. ओडिशातील के.टी.ग्लोबल स्कूलमध्ये पार पडलेल्या या राष्ट्रीय स्पर्धेत देशभरातून सोळा सर्वोत्तम संघांनी सहभाग घेतला होता. संपूर्ण स्पर्धेत सुरुवातीपासूनच आपले वर्चस्व राखत महाराष्ट्र संघाने सलग विजय मिळवले आणि राष्ट्रीय करंडकावर आपले नाव कोरले. महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधीत्व संगमनेरच्या ध्रुव ग्लोबल स्कूलने केले.



स्पर्धेच्या साखळी सामन्यांमध्ये महाराष्ट्र संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. पहिल्या सामन्यात मध्य महाराष्ट्र विरुद्ध फलंदाजी करताना महाराष्ट्राने १२२ धावा केल्या आणि विरोधी संघाचा ८० धावांनी पराभूत केले. दुसर्या अटीतटीच्या सामन्यात पश्चिम बंगालविरुद्ध ६८ धावांचे रक्षण करताना महाराष्ट्राने १५ धावांनी विजय मिळवला. तर तिसर्या सामन्यात विदर्भ संघासमोर १२३ धावांचे लक्ष्य ठेवून ८१ धावांनी दणदणीत विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश केला. उपांत्य फेरीच्या रोमांचक सामन्यात पंजाबविरुद्ध ७८ धावांचे लक्ष्य राखताना महाराष्ट्राच्या गोलंदाजांनी अचूक मारा करत आठ धावांनी विजय मिळवला आणि अंतिम फेरीत धडक दिली. अंतिम सामन्यात महाराष्ट्राच्या गोलंदाजांनी बिहारच्या संघाला अवघ्या ५४ धावांतच गारद केले आणि ५ गडी राखून राष्ट्रीय विजेतेपदाला गवसणी घातली.

या राष्ट्रीय स्पर्धेच्या विजेत्या महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व संगमनेरमधील ध्रुव ग्लोबल स्कूलच्या दहा खेळाडूंनी केले होते. राष्ट्रीय पातळीवर शाळेचे आणि राज्याचे नाव उंचावणार्या या संघात तेज जैन, श्रवण मुंदडा, प्रणव काकडे, अद्वैत ढोली, विनीत भन्साळी, साहिल शिरसाठ, सोहम कर्पे, रुद्र अभंग, यश बियाणी आणि धनराज डाके या विद्यार्थ्यांचा समावेश होता. या खेळाडूंनी संपूर्ण स्पर्धेत आपल्या उत्कृष्ट कौशल्याचे प्रदर्शन घडवले. सांघिक कामगिरीसोबतच वैयक्तिक स्तरावरही या विद्यार्थ्यांनी मोलाचे योगदान दिले. संघाचा अष्टपैलू खेळाडू श्रवण मुंदडा याने तीन सामन्यांमध्ये तर, प्रणव काकडे याने एका सामन्यात 'सामानावीर' होण्याचा मान मिळवला. प्रणवला स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट फलंदाजीचा पुरस्कारही देण्यात आला. क्रीडा प्रशिक्षक महेश जंगम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

५०-बॉल फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष ईशान जैन, महाराष्ट्र फेडरेशनचे अध्यक्ष योगेश चौधरी आणि ओडिशाचे सचिव यांच्या उपस्थितीत विजयी संघाला आणि खेळाडूंना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या सुवर्ण यशाबद्दल शाळेचे चेअरमन डॉ.संजय मालपाणी, व्हाईस चेअरमन गिरीश मालपाणी, प्राचार्या अर्चना घोरपडे आणि क्रीडा विभागप्रमुख गिरीश टोकसे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

ताम्हाणे हॉस्पिटल
पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
अधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
आजचा संपर्क करा- 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

पेजिनेशनसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005



भंडारी
“शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी”
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर सारीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# अमृतवाहिनी बँकेचा 'भारतरत्न सहकारीता' पुरस्काराने सन्मान

## तीन पुरस्कारांसह देश पातळीवर सन्मान



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा महाराष्ट्राचे माजी महसूल व शिक्षणमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील शेतकऱ्यांची आर्थिक कामधेनू असलेल्या सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँकेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला असून या बँकेला उत्कृष्ट कामकाजाबद्दल भारतरत्न सहकारीता पुरस्कार २०२६ ने सन्मानित करण्यात आले असून देश पातळीवरील विविध तीन पुरस्काराही मिळाले आहेत.

उत्तर प्रदेश मधील लखनऊ येथे संपन्न झालेल्या भारत को-ऑपरेटिव्ह बँकिंग समिट २०२६ मध्ये सहकार महर्षी अमृतवाहिनी सहकारी बँकेला भारतरत्न सहकारीता सन्मान हा पुरस्कार देण्यात आला. तर अमृतवाहिनी बँकेचे चेअरमन सुधाकर जोशी यांना बेस्ट चेअरमन, मुख्य कार्यकारी अधिकारी सुशील गुजराती यांना बेस्ट सीईओ व शून्य एनपीए बद्दल बेस्ट एनपीए मॅनेजमेंट चा पुरस्कार देण्यात आला. हे पुरस्कार आसाम राज्य सहकारी बँकेचे चेअरमन व विद्यमान आमदार विश्वजीत फुकण, भारत नेटवर्क ग्रुपचे अनुपम गुप्ता आणि आशिष श्रीवास्तव यांच्या हस्ते बँकेचे चेअरमन सुधाकर जोशी, व्हाईस चेअरमन अ‍ॅड. नानासाहेब शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी सुशील गुजराती, असिस्टंट जनरल मॅनेजर धनंजय जाधव यांनी स्वीकारले.

सहकारीता हा महाराष्ट्राच्या विकासाचा पाया असून सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या आदर्श तत्त्वावर आणि लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेरचा अमृत उद्योग समूह व विविध सहकारी संस्था कार्यरत आहेत. संगमनेरच्या सहकाराने देशाला कायम दिशा दिली असून अमृतवाहिनी बँकेचा हा देश पातळीवर सन्मान संगमनेरचा सन्मान वाढवणारा आहे.

लखनऊ येथे झालेल्या भारत को-ऑपरेटिव्ह बँकिंग समिटमध्ये अमृतवाहिनी बँकेच्या उत्कृष्ट कामकाज, गुणवत्ता, बेस्ट व्यवस्थापन, डिजिटल प्रणाली, अचूक कामकाज ,तत्पर सेवा, शून्य टक्के नेट एनपीए व १२०० कोटींची उलाढाल या सर्व बाबींचा विचार करून बँकेला यावर्षीच्या भारतरत्न सहकारीता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

तर बँकेच्या कामकाजामध्ये अत्यंत नियोजनपूर्वक व्यवस्थापन करणारे आणि युनियन बँकेचे निवृत्त अधिकारी व राज्य पातळीवर नेतृत्व केलेले बँकेचे विद्यमान चेअरमन सुधाकर जोशी यांनी आपल्या कार्यकाळात बँकेत राबवलेल्या विविध आधुनिक प्रणाली, अचूकता गुणवत्ता व कर्मचाऱ्यांचे सांघिक नियोजन करत बँकेच्या कामाची गुणवत्ता वाढवण्याबद्दल सुधाकर जोशी यांना बेस्ट चेअरमन म्हणून सन्मानित करण्यात आले.

बँकेचे चेअरमन व्हाईस चेअरमन व संचालक मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली सभासद ,ग्राहक, अधिकारी व कर्मचारी यांचे उत्कृष्ट व्यवस्थापन करणारे मुख्य कार्यकारी अधिकारी सुशील गुजराथी यांना बेस्ट सीईओ म्हणून गौरविण्यात आले तर बँकेने मागील आर्थिक वर्षात नेट एनपीएचे प्रमाण शून्य टक्के राखल्याबद्दल एनपीए मॅनेजमेंटचे अवॉर्ड बँकेला देण्यात आले.

या पुरस्कारानंतर चेअरमन सुधाकर जोशी म्हणाले की हा पुरस्कार सांघिक कामाचा असून लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी यांनी आपल्या कामकाजाची गुणवत्ता कायम ठेवून नागरिकांमध्ये मोठा विश्वास निर्माण केला आहे.

बँकेला मिळालेल्या पुरस्काराबद्दल चेअरमन , व्हाईस चेअरमन सर्व संचालक मंडळ व बँकेचे अधिकारी यांचे बँकेचे मार्गदर्शक माजी महसूल मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, आ. सत्यजित तांबे, अ‍ॅड माधवराव कानवडे, दुर्गाताई तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात, रणजीतसिंह देशमुख, शंकरराव खेमनर, बाबा ओहोळ, संपतराव डोंगरे, राजेश मालपाणी, इंद्रजीत भाऊ थोरात, नगराध्यक्ष डॉ मैथिलीताई तांबे,रामहरी कातोरे, हौशीराम सोनवणे, के के थोरात, बापूसाहेब टाक, अजय फटांगरे, सोमेश्वर दिवटे, यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले.

# पुण्यात ‘कॉकरोच’चा एल्गार

पुणे (वृत्तसंस्था)

दिल्लीतील जंतरमंतरवर झालेल्या चर्चित आंदोलनानंतर आता ‘कॉकरोच जनता पार्टी’ महाराष्ट्रात आपली ताकद दाखवण्याच्या तयारीत आहे. पक्षाचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी ११ जून रोजी पुण्यात मोठ्या आंदोलनाची घोषणा केली असून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येणार आहे. दिल्लीतील आंदोलनाला मिळालेल्या प्रतिसादानंतर आता पुणे हे या मोहिमेचे पुढील केंद्र बनले आहे.

कॉकरोच जनता पार्टीचा आरोप आहे की, देशातील स्पर्धा परीक्षा, भरती प्रक्रिया आणि शैक्षणिक व्यवस्थेतील कथित अनियमिततेमुळे लाखो विद्यार्थी व युवक त्रस्त आहेत. विशेषतः नीट परीक्षा, सीबीएसई निकालांशी संबंधित वाद आणि विविध भरती प्रक्रियांतील कथित त्रुटींमुळे विद्यार्थ्यांमध्ये असंतोष वाढला आहे. याच पार्श्वभूमीवर शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांची आहे.

६ जून रोजी दिल्लीतील जंतरमंतर येथे कॉकरोच जनता पार्टीने पहिले मोठे आंदोलन केले होते. या आंदोलनासाठी दिल्ली पोलिसांनी परवानगी दिली होती. आंदोलनात शेकडो विद्यार्थी, युवक आणि पालक सहभागी झाले होते. अनेक आंदोलकांनी कॉकरोचचे मुखवटे घालून निषेध नोंदवला होता. आंदोलन शांततापूर्ण पद्धतीने पार पडले आणि शिक्षण क्षेत्रातील प्रश्नांवर राष्ट्रीय स्तरावर चर्चा सुरू झाली.

गेल्या काही आठवड्यांत सोशल मीडियावर वेगाने लोकप्रिय झालेल्या या चळवळीची सुरुवात व्यंगात्मक स्वरूपात झाली होती. काही वादग्रस्त वक्तव्यांच्या पार्श्वभूमीवर अभिजीत दिपके यांनी ‘कॉकरोच जनता पार्टी’ची संकल्पना पुढे आणली. बेरोजगारी, शिक्षणातील समस्या आणि युवकांच्या वाढत्या असंतोषाला आवाज देण्याचा प्रयत्न म्हणून ही चळवळ उभी राहिल्याचा दावा केला जातो. अल्पावधीतच या मोहिमेला सोशल मीडियावर मोठा प्रतिसाद मिळाला.

INVOFIX
आजच सोलर सिस्टीम लावा व आपले लाईट बिल शुन्य करा
शासनामार्फत मिळणारी सबसिडी
1KW 30,000/- Rupees
2KW 60,000/- Rupees - 3KW 78,000/- Rupees
सौर उर्जा आजची गरज.. उद्याची बचत..
उपलब्ध सुविधा
१. बँक लोन सुविधा उपलब्ध
२. विज बिल शुन्य करा
३. मोफत मार्गदर्शन
४. फ्री साईट व्हिजीट
५. एक्स्पर्ट टिम, क्वालिटी वर्क
PM SURYA GHAR
आजच योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्या व भरघोस सबसिडी मिळवा.
Invofix Solution Pvt. Ltd., स्वागत मंगल कार्यालया समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहिल्यानगर.
7030334486
7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

# केवळ नेहरूंच्या कार्यकाळाची बरोबरी, मात्र तेव्हढी उंची गाठणे अशक्य- काँग्रेसचा मोदींना टोला

मुंबई (वृत्तसंस्था)

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या दीर्घ पंतप्रधानपदाच्या कार्यकाळाची बरोबरी केली असली, तरी ते नेहरूंची वैचारिक उंची कधीच गाठू शकत नाहीत. मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या कार्यकाळात देशाचे पूर्णपणे १२ वाजले असून जनता महागाई आणि बेरोजगारीने हैराण झाली आहे, असे म्हणत काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी मोदी सरकारवर निशाणा साधला आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, सरकारला ओबीसींची स्वतंत्र जनगणना करायची नाही. त्यांचे कारण काय आहे माहिती नाही. कदाचित सरकारला भीती असेल की संख्या पुढे आली तर त्यानुसार सर्व गोष्टी द्याव्या लागतील. सरकारने देशाला कंगाल केले आहे. आम्हाला लोकसंख्येच्या प्रमाणात सर्वच गोष्टीमध्ये आमचा वाटा मिळायला हवा. जितकी लोकसंख्या आहे त्या तुलनेत भागीदारी दिली पाहिजे. यासाठी जनगणना केली पाहिजे. आम्ही काय सरकारच्या बापाचे बांधलेले आहोत काय? आमचा ओबीसींचा कॉलम ठेवला तरच आम्ही सहकार्य करू. सरकारला जर गुन्हे दाखल करायचे असतील तर त्यांनी गुन्हे दाखल करावे.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, सरकारने जर आमचा कॉलम दिली नाही आणि माहिती न दिल्यावर गुन्हे दाखल करायचे ठरवले तर आम्ही सर्व ओबीसी मिळून जेलभरो आंदोलन करू. आमच्या हक्काचे तुम्ही देणार नसताल तर आम्ही जेलमध्ये जाण्यासाठी तयार आहोत.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, जनगणनेमध्ये ओबीसीचा कॉलम नाही. जनगणनेची पहिली फेरी ही संपत आली आहे. दुसऱ्या फेरीमध्ये आम्ही ओबीसींचा कॉलम अ‍ॅड करणार असे सरकार सांगितले जात आहे. मात्र मोदी सरकार हे काही करणार नाही.

अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
- मासिक पाळीच्या तक्रारी
- अंगावरून पांढरे जाणे
- गर्भ न रहाणे
- वारंवार गर्भपात होणे
- गर्भाशयात गाठी
- गर्भाशयाचा कर्करोग
- स्तनांची वाढ न होणे
- स्तनातून दूध न येणे
- स्तनात गाठी
- स्तनाचा कर्करोग
- योनी मार्गाची दुर्गंधी
- गुप्त अंगाला खाज
- विविध त्वचा विकार
- गुप्तरोग, गर्मी
- लघवीला जळजळ
- संभोगात रस न येणे
- संभोगा विषयीची भीती
- हस्तमैथूनाची सवय
- लैंगिक विकृती
- मानसिक नैराश्य
डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट
स्त्री रोग चिकित्सक
( ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू | कांजीवरम | सिल्क
पैठणी | बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर
422605

चैतन्य हॉस्पिटल
24 HRS EMERGENCY SERVICES
Health Emergencies Don't Wait.
Neither DO WE
२४ तास सुविधांसाठी
०२४२५ - २२४७६२
मोबा. ७०३८२७०३८२
डॉ. जठार हॉस्पिटल
ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
- सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25